**स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २८/११/२०१८

## मालेगावातील निजामिया चौक परिसरात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारा सराईत गुन्हेगार गजाआड

### देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे जप्त - स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन व गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी **मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. **मालेगाव शहरातील** निजामिया चौक परिसरात अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे सराईत गुन्हेगारास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे** मॅगझिनसह जप्त केले आहे.

आज दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहर परिसरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्तबातमी नुसार, निजामिया चौक परिसरात काही संशयीत इसम हे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने निजामिया चौक परिसरातील हॉटेल ताजसमोर सापळा रचुन सराईत गुन्हेगार नामे **मोहमद आरिफ मोहमद फारूख, वय २९, रा. जमहुर नगर, मालेगाव** यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाचे कब्जात ०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०२ जिवंत काडतुसे मॅगझिनसह मिळुन आले. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना मिळुन आला नाही, त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०२ जिवंत काडतुसे, मॅगझिनसह** हस्तगत करण्यात आले असुन सदर आरोपीविरूध्द **पवारवाडी पोलीस ठाणे ॥ गुरनं ६८/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेला आरोपी नामे मोहमद आरिफ मोहमद फारूख हा **सराईत गुन्हेगार** असुन त्याचेविरूध्द यापुर्वीही **पवारवाडी पोलीस ठाणेस खुनाचा प्रयत्न व जबर दुखापतीचे** गुन्हे दाखल आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो,** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, सपोनि **श्री. संदिप दुनगहू**, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, पोना चेतन संवत्सरकर, पोकॉ हरिष आव्हाड, गिरीष बागुल यांचे पथकाने मालेगाव शहरात अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे सराईत गुन्हेगारास ताब्यात घेवुन कारवाई केली आहे. **स्थानिक गुन्हे शाखेचे** पथकाने चालु पंधरवाडयात **अवैधरित्या अग्निशस्त्र** बाळगणारे **एकुण ०८ आरोपीतांविरूध्द** भारतीय हत्यार कायद्यान्वये कारवाई करून **०६ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ गावठी कट्टा**, **१७ जिवंत काडतुसे**, ०७ मॅगझिनसह हस्तगत केले आहे. आगामी काळात जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी व गुन्हेगारीस आळा बसावा यासाठी अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.